# मौर्य सम्राट

## चंद्रगुप्त मौर्य-चाणक्य यांच्या जीवनावर आधारित ऐतिहासिक कादंबरी

**राजेंद्र मोहन भटनागर**

अनुवाद

**गो. द. पहिनकर**

**रिया पब्लिकेशन्स्**

६७८-ई, शामराव विठ्ठल बँकेच्याशेजारी,
शाहूपुरी दुसरी गल्ली, कोल्हापूर - ४१६००१.
riyapublications@gmail.com
www.ajabgroup.com

**मौर्य सम्राट :** राजेंद्र मोहन भटनागर
अनुवाद : गो. द. पहिनकर

© **सुरक्षित**

**प्रकाशक**
रिया पब्लिकेशन्स्,
६७८-ई, शामराव विठ्ठल बँकेच्याशेजारी,
शाहूपुरी दुसरी गल्ली, कोल्हापूर - ४१६००१.
riyapublications@gmail.com
www.ajabgroup.com

**अनुवाद**
गो. द. पहिनकर
'श्रीकृपा', दत्तनगर,
जिंतूर रोड,परभणी.
मो. नं. ९९२०७०८३५०

**अक्षरजुळणी**
अजब ग्राफिक्स

**मुखपृष्ठ**
चित्रमित्र पब्लिसिटी, कोल्हापूर

**मुद्रक**
ऋग्वेद प्रिंटर्स, पुणे

**आवृत्ती**
ऑगस्ट २०१६

**किंमत**
₹ ५२०/-

प्रिय डॉ. तिपेस्वामी

यांना

झालेल्या न झालेल्या संवादांच्या

कृतज्ञतेत

# अनुवादकाचे दोन शब्द

एके दिवशी रिया पब्लिकेशन्सचे मेहताजी मला फोनवरून म्हणाले, ''आमच्या प्रकाशनातर्फे काही पुस्तकांचे अनुवाद प्रकाशित करायचे आहेत. तुम्ही एखाद्या पुस्तकाचा अनुवाद कराल का?'' मी 'हो' म्हणालो आणि त्यांनी मला काही पुस्तकांची नावं सांगितली. त्यापैकी 'मौर्य सम्राट' या ऐतिहासिक कादंबरीला मी पसंती दिली; कारण इतिहास हा माझा आवडता विषय आहे आणि बलदंड नंद वंशाचा शेवट करून मौर्य घराण्याची स्थापना करणारा चंद्रगुप्त मौर्य आणि अडीच हजार वर्षांनंतरही ज्यांच्या लिखाणाचा प्रभाव विद्वत्‌जनांवर कायम आहे, असे आर्य चाणक्य या उभयतांच्याबद्दल माझ्या मनात कुतूहल होतं.

इतिहासाच्या पुस्तकात एक-दोन पानात जी ऐतिहासिक घटना मांडली जाते, त्या घटनेवर भटनागर यांनी त्यांच्या अभ्यासातून आणि कल्पकतेतून ही ऐतिहासिक कादंबरी साकारलेली आहे. ही कादंबरी जेवढी ऐतिहासिक तेवढीच सामाजिक आणि मनोवैज्ञानिकही आहे. तत्कालीन भारताचे समाजजीवन ही कादंबरी पुनर्जीवित करते. या कादंबरीतील प्रत्येक पात्र वाचकाच्या मनाचा ताबा घेते. राजेंद्र भटनागर यांनी त्यांच्या लेखणीतून चित्रलिपीसारखे रेखाटलेले प्रसंग, भौगोलिक तपशील, विविध पात्रांमधील संवाद, त्यांच्या शब्दांमधून व्यक्त होणारी त्यांची मानसिकता जशीच्या तशी मराठी भाषेत आणण्याचा प्रामाणिक प्रयत्न मी केलेला आहे. भटनागर यांचे बहुमूल्य संशोधन, त्यांची प्रतिभासंपन्नता आणि कल्पकता मराठी भाषिकांपर्यंत पोहोचवण्यात मी कितपत यशस्वी झालो आहे ते वाचकच ठरवतील; पण महाराष्ट्रात या कादंबरीचे उत्स्फूर्त स्वागत होईल, याची मला खात्री वाटते. प्राचीन भारताच्या इतिहासात आनंददायक विहार करण्याची संधी मेहताजींनी मला दिली याबद्दल त्यांचे आणि त्यांच्या कर्मचारीवर्गाचे मनस्वी आभार.

गो. द. पहिनकर
परभणी

# स्वप्नांचे आकाश आणि आकाशाची स्वप्नं

''आम्हाला विसरण्याची सवय आहे आणि विसरलेले आठवण्याचीही! अर्थात, तशी वर्तमानाची मनस्वी मागणी आणि भविष्याला काही देण्याची दुर्दम्य इच्छा असेल तर!'' मी शिवाजी विश्वविद्यालय, कोल्हापूर येथे आयोजित 'इतिहास आणि साहित्य' विषयक आंतरराष्ट्रीय परिसंवादाचे उद्घाटन करत होतो. तिथे मी असे म्हणालो होतो की, 'इतिहासाकडे निवड करण्याची सुविधा नाही; पण साहित्याकडे मात्र ती आहे. जेव्हा वर्तमान त्याचा स्वतःचा ठेवा हरवायला लागतो तेव्हाच मुळी इतिहासाचे रूपांतर साहित्यात व्हायला लागते. तेव्हा तो त्याचे संचित चाचपडायला लागतो. ते देखील अशासाठी की, ते साहित्य त्याचा तिसरा डोळा बनू शकेल. अर्थातच अदृश्य-दृश्यमान व्हायला लागेल आणि त्याकडून अशीही अपेक्षा करता येईल की, ते त्याच्या भविष्यातील उदात्त स्वप्नांना साकार करू शकेल.' माझे संपूर्ण ऐतिहासिक साहित्य माझ्या याच संशोधनाची परिणती आहे.

या ठिकाणी माझी दृष्टी व्हिएन्ना येथे जन्मलेल्या कार्ल पॉपर या तत्त्ववेत्त्यावर जाऊन स्थिर होते. त्यांच्या मते ऐतिहासिक दृष्टी ही नेहमीच विशुद्ध ऐतिहासिक असत नाही. त्यांच्या मते इतिहास हा सापेक्ष असतो. इतिहासकार हा इतिहासापेक्षा स्वतःच्या मनातील रचनांना, घटना-विघटनांना अधिक महत्त्व देतो त्यामुळे असे म्हणावे लागते की, इतिहासकार अशाच घटनांना आणि तथ्यांना प्रभावितपणे रेखाटण्याचा प्रयत्न करतो ज्यांना त्याची स्वतःची मानसिकता परवानगी देते. साहित्य मात्र या पुढे जाऊन तो संभ्रमाचा पडदा दूर करते, ज्यातून इतिहास त्याची स्वतःची इच्छा असूनही मुक्त होऊ शकत नाही. अर्थात, साहित्य हे मुक्तीचे द्वार आहे.

इ. स. पूर्व ३४४ मधील भग्नावशेषात गाडल्या गेलेल्या इतिहासाचा जेव्हा मी शोध घ्यायला लागलो तेव्हा माझी दृष्टी कोळशाच्या खाणीत चकाकणाऱ्या एका हिऱ्यावर स्थिर होते आणि माझ्या सर्व अंतःप्रेरणांना एखाद्या गोल घुमटाची

जाणीव व्हायला लागते. नंद वंशाचा संस्थापक सम्राट महापद्मनंद याच्यापासून त्या महाकथेला सुरुवात होते. तो या देशाचा पहिला सम्राट होता; पण होता मात्र शूद्र. त्याच्याकडे एवढे विलक्षण असीम बल, साहस आणि तेज होते की, त्याला दुसऱ्या परशुरामाची प्रतिष्ठा बहाल करण्यात आली. जैन ग्रंथांप्रमाणे तो न्हावी पिता आणि त्याची वैश्या पत्नी यांचा पुत्र होता तर 'महावंशटिका' त्याचे कुल अज्ञात असल्याचे मानते. 'महाबोधवंश' तर त्याचे नावच बदलून त्याला उग्रसेन हे नाव बहाल करतो. ही आहेत इतिहासातील मिथके.

नि:संदिग्धपणे तो भाग्यवान होतो जो आमच्या इतिहासाची प्रतिष्ठा बनला. तो अपार संपत्ती आणि प्रचंड सैन्य-बलाचा स्वामी होता. एवढ्या विशाल भूप्रदेशाचा तो राजा झाला की, इतिहासात त्याच्यापूर्वी त्याच्यासारखा दुसरा कुणीही झाला नव्हता.

त्या वंशाचा अंतिम सम्राट जो त्याच्या पूर्वजांच्या महान परंपरेचा प्रकाशस्तंभ होता, 'कथासरित् सागर' या ग्रंथातील उल्लेखाप्रमाणे त्याची प्रजा त्याच्यावर नाखूश होती व त्यानेच आचार्य चाणक्याचा अपमान केला आणि याच कारणामुळे आर्य-चाणक्य आणि चंद्रगुप्त मौर्य यांनी मिळून त्याची हत्या केली. अशा पद्धतीने एका वंशाचा अंत होतो; पण अनेक प्रकारच्या संदिग्धतेसह! खरं तर या इतिहासात असंबद्धता आहे. अंधकारमयताही आहे. साहित्य विश्वास बहाल करू इच्छिते. इथे इतिहास आणि साहित्य एकमेकाच्या समोर येतात.

साहित्य एक मार्ग बनवू इच्छिते. अंधकारमय अवस्थेतून मुक्ती देण्याचा साहित्याचा प्रयत्न असतो. त्याच्या समोर असतं त्याच्या काळाच्या स्वप्नांचं आकाश आणि त्या आकाशाची स्वप्नं आणि ती स्वप्नं मला प्रेरित करतात आणि माझ्या मनात पाटणा येथे जाण्याची इच्छा निर्माण करतात. मी तिथे जातो आणि 'पाटलीपुत्रा'चा शोध घेण्याचा प्रयत्न करतो. माझा तो प्रयत्न नंद वंशाच्या शेवटच्या टोकावर उभं राहून सुरू होतो. जेव्हा मी त्या असीम वैभवाचा आस्वाद घेतो. गंगा आणि सोन नदीच्या संगम-परिसरात कधी काळी अस्तित्वात असणाऱ्या अपरिमित वैभव-संपन्नतेच्या कल्पनेत रमून जातो तेव्हा एक स्वप्न माझ्या मनात जागृत होतं आणि ते स्वप्न असतं एका वैभवसंपन्न महानगरीचं आणि त्या महानगरीतील असीम सौंदर्याने नटलेल्या दगड-विटा व उच्च प्रतीच्या लाकडांनी बांधलेल्या बहुमजली आकर्षक राजवाड्याचे!

एक गोष्ट मान्यच करावी लागेल की, पूर्वी आमच्याकडे इतिहास-लेखनाची दृष्टी नव्हती आणि त्यात रुची घेऊन रचना करण्याची इच्छाही नव्हती; पण आमच्याकडे होते, सहसंबंधातील भावभावनांच्या प्रेमाची ऊब आणि त्या भावसंबंधाचे ते जिवंत क्षण! आणि त्या स्नेहल क्षणांना इतिहास नाही तर केवळ साहित्यच पुनर्जीवित करू शकते.

इतिहास-साहित्यात जगण्याची आम्हाला सवय आहे, कारण आम्ही तथ्यांपेक्षा तत्त्वांशी अधिक आंतरिक संबंध विकसित केलेले आहेत. तरीही इतिहास हा इतिहासच आहे आणि जसे विज्ञान हे विज्ञान आहे त्याच अर्थाने इतिहास हा इतिहास आहे. अर्थात, शक्यतांच्या केंद्रात उडी मारून पोहण्याचा अनुभव इतिहास देतो.

मी ज्या काळाच्या संदर्भात बोलतो आहे त्यातील पुरावे शोधण्यासाठी जेवढे उत्खनन झाले तेवढेच किंवा त्याहीपेक्षा अधिक उत्खनन (संशोधन) मी त्या काळाला ऐतिहासिक ठेव बनविण्याच्या उद्देशाने केले. त्या पुराव्यानंतर चर्चा होणे अपेक्षित होते आणि ती चर्चा झालीही. एवढेच नाही तर ती चर्चा अजूनही चालू आहे. ती कधी बंद होणार नाही आणि बंद होणे योग्य नाही. कारण त्यातच आमचे भविष्य लपलेले आहे. भविष्य हे काही बाबतीत ज्योतिषासारखे असते. त्यात मागील घटनांकडून पुढील घटनांचा वेध घेण्याची तीव्र लालसा असते.

खरंच आज मॅगेस्थिनिजच्या अस्थी सापडल्या तर आम्हाला स्वतःला आश्चर्याच्या समुद्र-तटावर विहार केल्यासारखे वाटेल! इतिहासकाराची अशी जिद्द असते की, त्याची नव्याने स्थापना व्हावी आणि त्याचे महत्त्व त्याला मिळावे. त्या जिद्दीत जीवनाबद्दलची जिज्ञासा असते, ओढ असते.

मॅगेस्थिनिजपासून ते सातव्या शतकात भारतात येऊन गेलेल्या ह्यूएनसंगपर्यंत अनेकांनी 'नंद वंशाच्या' अतुलनीय वैभवाचे वृत्तांत ऐकलेले होते. त्यांना हे देखील कळले होते की व्याकरणाचार्य 'पाणिनी' हा महापद्मनंदाचा मित्र होता, तर धनानंदाच्या दरबारात वररुची, कात्यायन आणि इतरही काही विद्वान होते. तक्षशिला येथे सापडलेल्या नाण्यांवरून हे सिद्ध होते की, पश्चिमोत्तर भागात मगधचे नाणे चलनात होते. जेनोफेनकृत 'सांयरोपेडिया' मध्ये नमूद करून ठेवले आहे की पश्चिमी आशियाई देशांमधील तंटे मगधच्या शासनाच्या मध्यस्थीने मिटत असत. तो जगातील सामाजिक आणि राजकीय घडामोडींचा महत्त्वाचा केंद्रबिंदू होता, आधारस्तंभ होता.

अशा विशाल आणि बलवान नंद वंशाचा शेवट चंद्रगुप्त मौर्यानं आर्य चाणक्य यांच्या मार्गदर्शनाखाली घडवून आणला. आर्य चाणक्याचे कौटिल्य-अर्थशास्त्र या संबंधी बरेच काही सांगून जाते. अर्थात त्यातही अनेक प्रक्षिप्त वृत्तांत आढळतात आणि त्यांच्या संदर्भात शंका उपस्थित करण्यात आल्या आहेत. एवढ्या शंका की, कीथ, विंटरनित्ज, जाली आणि इतर विद्वान, त्या ग्रंथाला कौटिल्य यांची कृतीच मानायला तयार नाहीत कारण मॅगेस्थिनिज आणि पतंजली यांच्यापैकी कुणीही कौटिल्य-चाणक्य याचा नामोल्लेखही केलेला नाही. 'इति कौटिल्य' या शब्दांवरून असेही ध्वनित होते की, त्यासाठी इतरांची आवश्यकता का भासली? पण 'अर्थशास्त्राचा उपसंहार' या सर्व शब्दांचे निरसन करून जातो. उपसंहारावरून हे सिद्ध होते की, अर्थशास्त्र या ग्रंथाची रचना अशा व्यक्तीकडून झालेली आहे ज्या व्यक्तीने रागाच्या आहारी जाऊन शस्त्र, शास्त्र आणि नंद राजाच्या हातात गेलेल्या पृथ्वीला मुक्ती दिली.

मग हा प्रश्न उपस्थित होतो की चंद्रगुप्त मौर्य कोण होता? क्षेमेंद्र कृत 'बृहत्कथा मंजिरी' आणि सोमदेव विरचित 'कथासरितसागर' या दोन ग्रंथात त्या संदर्भात कथा आहेत; पण संभ्रम निर्माण करणाऱ्या आहेत. 'मुद्राराक्षस' या नाटकानुसार तो नंद राजाचा मुलगा आहे. 'विष्णुपुराण' या ग्रंथाचे भाष्यकार श्रीधर स्वामी असं म्हणतात की तो (चंद्रगुप्त) नंदराजाची मुलगी 'मुरा' हिच्या पोटी जन्मला होता. 'जस्टिन'चे असे मत आहे की तो सामान्य कुळात जन्मला हे खरे असले तरी सम्राट बनण्याची त्याची महत्त्वाकांक्षा होती. चाणक्य त्याला क्षत्रियच मानतो. एका इतिहासकाराच्या दृष्टीने चंद्रगुप्त मौर्य हा चार वर्णांच्या पैकी नेमका कोणत्या वर्णाचा होता हे निश्चित करणे महत्त्वाचे असू शकते; पण एका साहित्यिकाला मात्र चंद्रगुप्त मौर्य या सामान्य युवकाने मगधचे सम्राटपद प्राप्त करण्यासाठी जो संघर्ष केला त्याचा शोध घेण्यात अधिक रुची असणार. या भूमीची शक्ती-एक सामान्य भूमिपुत्र सम्राटपदापर्यंतचा प्रवास नेमका कसा करतो- कोणकोणत्या अडथळ्यांना कशा-कशा पद्धतीने ओलंडून तो सम्राटपदावर विराजमान होऊ शकला- या कथासूत्रात समाविष्ट असणारा जीवन-संघर्षच इतिहासाचे रूपांतर साहित्यात करत असतो.

चंद्रगुप्ताच्या समोर एका बाजूला सिकंदर (एलेक्झांडर) आणि सेल्यूकस निकेटर (सिकंदराच्या मृत्यूनंतर झालेला बाबिलोनियाचा शासक) यांचे आव्हान